This question paper consists of 37 questions and 12 printed pages.
ह्या प्रश्नपत्रिकेत एकूण 37 प्रश्न आणि 12 छापील पाने आहेत.

Roll No. | | | | | | | | | | | | |
अनुक्रमांक

Code No. 69/S/A/M
कोड नं.

Set / सेट - A

# MARATHI
## (मराठी)
## (204)

Day and Date of Examination
(परीक्षेचा दिवस आणि तारीख) ____________________

Signature of Invigilators 1. ____________________
(निरीक्षकाची सही)
2. ____________________

**सामान्य अनुदेश :**

**1.** **सर्व** प्रश्नांचे उत्तर तुम्हाला दिलेल्या उत्तर–पुस्तिकेतच लिहायची आहेत.

**2.** या प्रश्न–पत्रिकेला वाचण्यासाठी **15** मिनिटाचा वेळ दिला गेला आहे. प्रश्न–पत्रिकेचे वितरण दुपारी **02.15** वाजता करण्यात येईल. **02.15** ते **02.30** पर्यंत विद्यार्थी केवळ प्रश्न–पत्रिका वाचतील आणि या वेळेत उत्तर–पुस्तिकेत कोणतेही उत्तर लिहणार नाहीत.

**3** परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेच्या प्रथम पृष्ठावर आपला अनुक्रमांक लिहावा.

**4** कृपाकरून प्रश्न–पत्र तपासून घ्या की पुस्तकाचे एकंदर पृष्ठ आणि प्रश्नांची संख्या प्रथम पृष्ठावर सर्वात वर छापलेली आहे, तेवढीच आहे किंवा नाही. तसेच प्रश्नांची संख्यापण क्रमिक रूपात असावी.

**5** बहुपर्यायी प्रश्नांचे उत्तर देतांना तुम्हाला दिलेल्या पर्यायांतून योग्य तो पर्याय निवडावयाचा आहे. वेगळी देण्यांत येणाऱ्या उत्तर–पुस्तिकांमध्ये योग्य उत्तर लिहायचे आहे.

**6** बहुपर्यायी प्रश्नांच्या सोबतच सर्व प्रश्नांची उत्तरे निर्धारित वेळेतच द्यावयाची आहेत. बहुपर्यायी प्रश्नांसाठी जास्त वेळ देण्यांत येणार नाही.

**7** उत्तर–पत्रिकेत ओळख निदर्शनास आणणे आणि योग्य जागेच्या व्यतिरिक्त अनुक्रमांक लिहल्यास परीक्षार्थीला अयोग्य ठरविण्यांत येईल.

**8** आपल्या उत्तर–पत्रिकांवर प्रश्न–पत्रिकेची कोड संख्या **69/S/A/M,** सेट - A लिहावेत.



Unnati Educations
9899436384, 9654279279

# MARATHI

# (मराठी)

# (204)

**वेळ : 3 तास]** **[एकूण गुण : 100**

**निर्देश :**

(i) या प्रश्नपत्रिकेत एकूण **37** प्रश्न आहेत आणि सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(ii) प्रश्नपत्रिकेत दोन विभाग आहेत. विभाग–**अ** आणि विभाग–**ब**

(iii) विभाग 'अ' मध्ये वस्तुनिष्ठ/बहुपर्यायी प्रश्न आहेत तर विभाग 'ब' मध्ये विषयनिष्ठ/वर्णनात्मक प्रश्न आहेत. विभाग **अ** – **50** गुण व विभाग **ब** – **50** गुण आहेत = **100** गुण

(iv) विभाग 'अ' मध्ये एकूण **27** प्रश्न आहेत.

- प्रश्न क्र. **1** ते **12** गद्‍य
- प्रश्न क्र. **13** ते **20** पद्‍य
- प्रश्न क्र. **21** ते **27** व्याकरण

(v) विभाग 'ब' मध्ये एकूण **28** ते **37** प्रश्न आहेत.

- प्रश्न क्र. **28** ते **30** गद्‍य–पद्‍य
- प्रश्न क्र. **31** ते **32** व्याकरण
- प्रश्न क्र. **33** ते **34** उताऱ्यावरील प्रश्न
- प्रश्न क्र. **35** ते **37** लेखन कौशल्यावर आधारित उदा. निबंधलेखन, पत्रलेखन व सारांशलेखन इ.



Unnati Educations
9899436384, 9654279279

## विभाग–अ (वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न)

दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1 लोकमान्य टिळकांचा श्रीमद्‌भगवद्‌गीतेची शिकवण सांगणारा प्रसिद्ध ग्रंथ कोणता? 1

(अ) ओरायन (ब) गीतारहस्य

(क) बनगरवाडी (ड) स्मृतिचित्रे

2 कोणाचे स्थान पिता व गुरू यांच्यापेक्षा वरचे आहे? 1

(अ) आई (ब) मित्र

(क) आजी (ड) आचार्य

3 नागू अंगाने कसा होता? 1

(अ) काटक (ब) स्थूल

(क) गुटगुटीत (ड) कृश

4 चूक की बरोबर ते लिहा. 3

(1) 'शेतकऱ्यांची स्थिती' हा उतारा 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथातील आहे.

(2) महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी आपला देह वयाच्या नव्वदाव्या वर्षी ठेवला.

(3) दिलीप धारूरकर हे पर्वतशिखर या पाठाचे लेखक आहेत.

5 रिकाम्या जागा भरा. 3

(1) रेव्हरंड टिळकांनी _______ धर्म स्वीकारला.

(2) _______ हे अक्षर आपल्या संस्कृतीतील मांगल्याचे, प्रसन्नतेचे व सौंदर्याचे प्रतीक आहे.

(3) पारतंत्र्याच्या काळात आपल्या देशात _______ भाषेचे वर्चस्व वाढले होते.

6 जोड्या लावा – पाठ आणि पाठाचे लेखक यांच्या जोड्या लावा. 4

| **(पाठ) 'अ'गट** | **(लेखक) 'ब'गट** |
|---|---|
| (1) श्री | आचार्य विनोबा भावे |
| (2) तू तर माझ्याही | दिलीप धारुरकर |
| (3) मातृशक्तीचे महत्व | लक्ष्मीबाई नारायण टिळक |
| (4) पर्वतशिखर | वि. स. खांडेकर |

दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.



Unnati Educations
9899436384, 9654279279

7 आचार्य विनोबा भावे आईचा उल्लेख ______ करतात. 2

(अ) देवी (ब) जननी ग्राममाता

(क) माता (ड) ग्राममाता

8 सुशिक्षितांना केसरी पत्र चालणार नाही असे वाटले, कारण..... 1

(अ) केसरी पत्र आठवड्यातून दोनदाच काढले जाई.

(ब) ते निव्वळ मराठीत काढले जाई.

(क) केसरी पत्राची भाषा अनाकलनीय होती

(ड) केसरी वाचकांना आवडेल याची खात्री वाटत नव्हती.

9 चोराला नागूच्या घरी काही मिळाले नाही, कारण.... 1

(अ) नागू गरीब होता.

(ब) नागूच्या बायकोने चोराला सोन्याचा पत्ता लागू दिला नाही.

(क) चोराला सापडलेल्या पेटीत काहीच नव्हते.

(ड) नागूला उठवून चोर ट्रंकेची किल्ली घेऊ शकला नाही.

10 केशव आणि त्याच्या मित्रांनी वझे गुरुजींच्या घरातून किल्ल्याकडे जाणारे भुयार खणायला सुरुवात केली, कारण.... 1

(अ) भुयारातुन असहकार आंदोन उभे करायचे होते.

(ब) केशव व त्याचे सहकारी कार्यकर्ते होते.

(क) इंग्लंडच्या राणीच्या राज्यरोहणाला साठ वर्षे झाली होती.

(ड) किल्ल्यावरचा युनियन जॅक काढून तिथे भगवा ध्वज लावायचा होता.

11 टिळक कुटुंबियांनी वाईला जाण्याचे ठरवले, कारण.... 1

(अ) नगरला जाण्याचा विचर रद्द केला होता.

(ब) ताराच्या तब्येतीला महाबळेश्वरची थंडी व नगरचे ऊन सहन होणार नव्हते.

(क) टिळकांना वाई ठिकाण फार अवडायचे.

(ड) ताराने वाईला जायचा हट्ट केला.

12 पुरुष हा अर्थाचा दास आहे, हे ______ वचन आहे. 1

(अ) वाल्मिकींचे (ब) अर्जुनाचे

(क) भीष्माचार्यांचे (ड) श्रीकृष्णाचे



Unnati Educations
9899436384, 9654279279

दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

13 'बलसागर भारत होवो', या कवितेचे कवी कोण? 1

(अ) साने गुरुजी
(ब) ग. दि. माडगूळकर
(क) कुसुमाग्रज
(ड) शांता शेळके

14 ज्ञानेश्वरांनी 'विश्वात्मके' हे विशेषण कोणासाठी वापरले आहे? 1

(अ) सजीवांसाठी
(ब) निर्जीवांसाठी
(क) देवासाठी
(ड) सज्जनांसाठी

15 चूक की बरोबर ते लिहा. 3

(1) बाळाच्या चिमण्या ओठातून हाक बोबडी येते.
(2) दुंदुभीचा आवाज रणभूमीवर उत्साह वाढवणारा असतो.
(3) सूर्य म्हणजे अंधार व अज्ञानाचे प्रतीक होय.

16 रिकाम्या जागा भरा. 3

(1) वैभवी देश चढवीन/स्वातंत्र्य त्यासि ______.
(2) त्याचेंच त्या कळाले – तो ______ एक!
(3) उठतात ______ त्याची पाऊलचिन्हे

17 कविता आणि कवी यांच्या जोड्या लावा. 4

| **(कविता) 'अ' गट** | **(कवी) 'ब' गट** |
|---|---|
| पहा टाकले पुसुनी डोळे | ग.दि. माडगूळकर |
| एका तळयात होती | ज्ञानेश्वर |
| पसायदान | नामदेव ढसाळ |
| आता | शांता शेळके |



Unnati Educations
9899436384, 9654279279

18 दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. 1

या जगण्यावर शतदा प्रेम करावे, ही कविता पुढीलपैकी कोणत्या प्रकारात मोडते?

(अ) मुक्तचंद (ब) गीत

(क) अभंग (ड) ओवी

19 वीरपत्नी पतीच्या भाळी कोणता तिलक लावणार आहे? 1

(अ) कुंकुमतिलक (ब) शुभतिलक

(क) विजयतिलक (ड) तिलक

20 प्रत्येकजण पिल्लाशी कसा बोलत असे? 1

(अ) टोचून (ब) उद्धटपणे

(क) शांतपणे (ड) आनंदाने

21 आभाळागत माया तुझी आम्हांवरी राहू दे! या वाक्यातील अलंकार ओळखा. 1

(अ) दृष्टांत (ब) अनुप्रास

(क) उपमा (ड) यमक

22 आकाशात <u>शुभ्र</u> बगळ्यांची माळ दिसली. अधोरेखित शब्दाचा प्रकार लिहा. 1

(अ) विशेषण (ब) नाम

(क) सर्वनाम (ड) क्रियापद



Unnati Educations
9899436384, 9654279279

**23** चूक की बरोबर लिहा. **3**

(1) आनंद, दु:ख, भीती यांसारख्या उत्कट भावना ज्या शब्दांनी व्यक्त होतात त्या शब्दांच्या पुढे उद्‌गारचिन्ह देतात.

(2) नामाऐवजी येणाऱ्या शब्दाला विशेषण म्हणतात.

(3) सारांशलेखनामुळे मुद्‌देसूद व थोडक्यात लिहिण्याचे कौशल्य प्राप्त होते.

**24** दिलेल्या पर्यायांतून अचूक शुद्ध शब्द ओळखा. **3**

(1) (अ) अनिष्ठ (ब) अनिष्ट (क) अनीष्ठ (ड) अनीष्ट

(2) (अ) निस्वार्थी (ब) नि:स्वार्थी (क) नीस्वार्थी (ड) निस्वा:र्थी

(3) (अ) जेष्ठ (ब) जेषठ (क) ज्येष्ट (ड) ज्येष्ठ

**25** दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. **3**

(a) क्रियेबद्‌दल विशेष माहिती सांगणाऱ्या व अविकारी राहणाऱ्या शब्दांना काय म्हणतात?

(अ) क्रियापद (ब) क्रियाविशेषण अव्यये

(क) विशेषण (ड) सर्वनामे

(b) आपण केलेली खोडी उघडकीस आल्यावर जयंताने______ (योग्य वाक्प्रचार लिहा.)

(अ) समर्पण केले. (ब) भांडण केले.

(क) आकाशपाताळ एक केले (ड) कबूल केले.

(c) दोन किंवा अधिक माणसे एकत्र आली की. त्यांच्यामध्ये जे बोलणे होते, त्याला काय म्हणतात?

(अ) संभाषण (ब) संवाद

(क) विचारमंथन (ड) वादविवाद



Unnati Educations
9899436384, 9654279279

**26** सूचनेप्रमाणे लिहा. **2**

पुढे दिलेल्या शब्दसमूहाला एक शब्द सुचवा.

(अ) महिन्यातून प्रसिद्ध होणारे नियतकालिक

(ब) लोकांचे नेतृत्व करणारा

**27** खालील शब्दांच्या विरुद्धार्थी शब्दांत जोड्या जुळवा. **2**

| | |
|---|---|
| (अ) आरंभ | (अ) परतंत्र |
| (ब) स्वतंत्र | (ब) निंदा |
| (क) स्तुती | (क) अहित |
| (ड) हित | (ड) शेवट |

**28** खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे **20** ते **30** शब्दांत लिहा. **6**

(अ) राज्यसत्तेतील स्थित्यंतरामुळे मराठी भाषेवर कोणते परिणाम झाले आहेत, असे टिळकांना वाटते ?

(ब) आचार्य विनोबा भावे यांच्या मते आईचे मातृत्व नेमके कशात आहे ?

(क) लग्नापूर्वी नागूचा रोजचा कार्यक्रम काय असे ?

(ड) शेतकरी सावकाराबरोबर वाद का घालत नाही ?

**29** खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे **20** ते **30** शब्दांत लिहा. **6**

(अ) संत ज्ञानेश्वरांनी दुष्ट लोकांसाठी कोणती इच्छा प्रकट केली आहे ?

(ब) पिंपळपानावर अवघे विश्व तरून जाईल असे कवीला का वाटते ?

(क) वीरपत्नी आपल्या शूर पतीला 'पहा टाकले पुसुनी डोळे' या कवितेत काय सांगते ?

(ड) बदकाच्या उदाहरणातून कवीने मानवी स्वभावाचे कोणते विशेष सांगितले आहेत ?



**Unnati Educations**
**9899436384, 9654279279**

30 खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे 30 ते 50 शब्दांत लिहा. 9

(अ) कंदील फुटून जखमी झाल्यावरही टिळक कसे वागले?

(ब) लेखक वि.स.खांडेकर यांचे अपरिग्रहव्रत कोणते?

(क) कवी साने गुरुजी यांनी कोणती प्रतिज्ञा केली आहे?

(ड) ईश्वराची पाऊले कधी दिसली का, या कवीच्या प्रश्नाला चांदण्या काय उत्तर देतात?

31 (अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. 2

(अ) फुलांचा ______ गुच्छ

(ब) जनावरांचा ______ कळप

**किंवा**

'नामानिराळे असणे'या वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

(ब) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. 2

(अ) समुद्र ______

(ब) मुलगा ______

(क) बक्षीस ______

(ड) झरा ______

32 कंसातील सूचनेनुसार प्रश्न सोडवा. 4

(अ) त्याला वाईट वाटले. (या वाक्यातील सर्वनाम शोधून लिहा.) 2

(ब) दोन वस्तूतील साम्य चमत्कृतिपूर्ण रीतीने जेथे वर्णन केलेले असते तेथे ______ अलंकार होतो.

**किंवा**



Unnati Educations
9899436384, 9654279279

अगं एवढा मोटा चोर येऊन गेला घरात, मला उठवायचं न्हायीस

(या वाक्यात वापरलेली विरामचिन्हे ओळखा व लिहा.)

(ब) खालील वाक्यातील काळ ओळखा. **2**

(अ) तो काळ पारतंत्र्याचा होता.

(ब) श्री हे आमच्या मराठेपणाचे प्रतीक आहे.

**33** खालील उतारा वाचून त्या खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.

तुलसी आजी या आदिवासी जमातीतल्या आहेत. त्यांची नाळच मुळी निसर्गाशी जोडलेली आहे. वयाच्या दुसऱ्या वर्षी त्यांचे वडील वारले. आईसोबत एक नर्सरीत रोजंदारीवर काम करत तुलसी लहानाच्या मोठ्या झाल्या. कर्नाटकात एकूणच जैववैविध्य भरपूर आहे. त्यात तुलसी या वनखात्यात स्वयंसेवक म्हणून काम करत होत्या. त्यांचें निसर्गाचं वेड आणि मुख्य म्हणजे ज्ञान पाहून वन विभागाने त्यांना एका नर्सरीचं काम देऊ केलं. वन विभागाच्या कामात तुलसी आजींनी स्वतःला झोकून घेतलं. गेल्या दहा दशकात त्यांनी 30,000 हून अधिक झाडं रुजवली, वाढवली. त्यांची देखभाल केली. बी–बियाण्यांचं जतन, संवर्धन, लागवड आणि रोपांची निगा यातल्या तुलसी गौडा एक विश्वकोश बनल्या. स्थानिक वनस्पती, त्यांचे उपयोग यांचा चालता–बोलता संग्रह. कोणतंही औपचारिक शिक्षण नसतांना त्या वनस्पती शास्त्रात स्वतःच्या अनुभवातून पारंगत बनत गेल्या. त्यांचं निसर्गाप्रति असलेलं काम, तळमळ पाहून तिथले लोक त्यांना 'वनदेवी', 'जंगलाचा कोश' संबोधू लागले.

(a) तुलसी आर्जीची नाळ कशाशी जोडलेली आहे ? **1**

**किंवा**

तुलसी आजींनी किती झाडं रुजवली ?

(b) तुलसी आजींना नर्सरीत काम का दिलं गेलं ? **1**

**किंवा**

तुलसी आजी कशाच्या चालता बोलता संग्रह बनल्या ?

(c) लोक तुलसी आजींना वनदेवी का संबोधू लागले ? **1**



Unnati Educations
9899436384, 9654279279

34 खालील पद्यांश वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा.

विंचू चावला वृश्चिक चावला। कामक्रोध विंचू चावला।
तम घाम अंगासी आला ॥ धृ ॥
पंचप्राण व्याकुळ झाला। त्याने माझा प्राण चालिला।
सर्वांगाचा दाह झाला॥
मनुष्य इंगळी अति दारूण।
मज नांगा मारिला तिनें।
सर्वांगी वेदना जाण।
त्या इंगळीची॥२॥
ह्या विंचवाला उतारा।
तमोगुण मागें सारा।
सत्वगुण लावा अंगारा।
विंचू इंगळी उतरे झरझरां॥३॥
सत्व उतारा देऊन।
अवघा सारिला तमोगुण।
किंचित राहिली फुणफुण।
शांत केली जनार्दने॥४॥

(a) कामक्रोधरूपी विंचू–इंगळी उतरवण्याचे उपाय लिहां. 1

**किंवा**

घाम अंगासी का आला आहे ?

(b) मनुष्याला सर्वांगी वेदना का जाणवत आहे ? 1

**किंवा**

इंगळी चावल्याने काय परिणाम झाला आहे ?

(c) किंचित राहिलेली फुणफुण कोणी शांत केली ? 1



Unnati Educations
9899436384, 9654279279

35 खालील उतारा वाचून स्वतःच्या भाषेत त्याचे एक तृतीयांश शब्दांत सारांशलेखन करा व उताऱ्याला योग्य शीर्षक द्या. 4

वाहनाचा वेग वाढला म्हणजे त्याच्यावरचा ताबा कमी होता. पुढचे वाहन मागे टाकून पुढे जाण्याच्या हव्यासामुळे अनेक अपघात होतात. रात्रीच्या वेळी विलक्षण वेगाने धावणारी गाडी ही रातराणी म्हटली जाते. रात्री भरघाव वेगाने प्रवास करून पार पाडावीत एवढी महत्वाची कामे दरवेळी असतात का? वाहनाचा वेग अनिवार झाला, तर चित्ताची व्यग्रता वाढते. डोक्यांवर, मनावर, शरीरावर ताण पडतो. शरीरभर अनावश्यक स्पंदने निर्माण होतात. कमरेची आणि पाठीची दुखणी ही वाहनधारकांची व्यथा असते. बसणे, उठणे, चढणे, उतरणे, चालणे, वळणे, वर–खाली पाहाणे या मुक्त हालचालींचे संगीत विसरून स्वतःला वाहनाशी जखडून ठेवणे आणि वाहनाचा वेग अंगीकारून आपल्या शरीरव्यापारात अडथळे निर्माण करणे हे धोरण निसर्गविरोधी आहे. आरोग्याची हानी करणारे आहे. वाढता वेग म्हणजे ताण. जीवनातले ताणतणाव वाढवून पोचणार तरी कुठे? आपले स्वत्व आणि स्वस्थता हिरावून घेणारा अस्वाभाविक वेग कमी करणे. हे आपले कर्तव्य आहे.

36 उज्ज्वल यशासाठी नियमित अभ्यासाची गरज आहे, हे पत्राने धाकट्या भावाला कळवा. 5

**किंवा**

दूरचित्रवाणी केंद्र पाहण्याबाबत संचालकांना पत्र लिहा.

37 खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर 150 ते 200 शब्दांत निबंध लिहा. 6

(1) माझा आवडता खेळाडू

(2) बहिर्जी नाईक पुन्हा अवतरले तर...

(3) प्रदूषणाच्या विळख्यात

(4) पाऊस अनुभवताना

---



Unnati Educations
9899436384, 9654279279